
THE SQUARE CIRCLE CLINIC



# CERTIFICATE COURSE ON CRIMINAL DEFENCE PRACTICE

हैदराबाद येथील नालसार विधी विद्यापीठाच्या द स्क्वेअर सर्कल क्लिनिकतर्फे पुणे येथे आयोजित सातत्यपूर्ण विधी शिक्षण (Continuing Legal Education – CLE) कार्यक्रम

विधी शिक्षणातून मिळणारे सैद्धांतिक ज्ञान आणि विचारण न्यायालयांमध्ये प्रभावी फौजदारी बचावासाठी आवश्यक व्यावहारिक कौशल्ये यांमध्ये समन्वय साधण्यासाठी

हा अभ्यासक्रम फेअर ट्रायल प्रोग्रामच्या टीमने संकल्पित केला असून, त्यांनी आठ वर्षांहून अधिक काळात ५,००० हून अधिक फौजदारी खटले हाताळले, १,५०० हून अधिक विचारणाधीन कैद्यांची (Undertrial Prisoners) सुटका करणे आणि नवोदित वकील व सामाजिक कार्यकर्त्यांना दिलेले प्रशिक्षण यांच्या आधारे मिळालेल्या आठ वर्षांहून अधिक कालावधीच्या अनुभवाच्या आधारे 'फेअर ट्रायल प्रोग्राम' (Fair Trial Programme) टीमने याची संकल्पना मांडली आहे. तसेच, उच्च न्यायालये आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयात फाशीच्या शिक्षेच्या ८० हून अधिक खटल्यांमध्ये 'क्लिनिक'ला आलेल्या अनुभवाचाही या अभ्यासक्रमाच्या निर्मितीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

THE SQUARE CIRCLE CLINIC

# कोण अर्ज करू शकतात?

**हा अभ्यासक्रम विशेषतः खटला न्यायालयांसमोरील (Trial Courts) फौजदारी बचाव खटलेबाजीत (Criminal Defense Litigations) २ ते ७ वर्षांचा अनुभव असलेल्या आणि संरचित शिक्षण व व्यावहारिक अनुभव मिळवू इच्छिणाऱ्या वकिलांसाठी तयार करण्यात आला आहे.**

# अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- **प्रत्यक्ष कामाच्या अनुभवावर आधारित सखोल प्रशिक्षण**
- **मानसशास्त्र, न्यायवैद्यक (Forensics), तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे यांसारख्या विषयांशी आंतरशाखीय (Interdisciplinary) संवाद**
- **मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये अध्यापन**
- **अनुभवी फौजदारी बचाव वकील, वरिष्ठ वकील, निवृत्त न्यायाधीश आणि विधी अभ्यासक यांच्याशी संवाद व मार्गदर्शन**
- **अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर पुढील सहा महिन्यांसाठी प्रकरणांवर मार्गदर्शन (Mentoring on Cases )**
- **अभ्यासक्रमाच्या कालावधीत नालसार विधी विद्यापीठाच्या ई-ग्रंथालयातील (E-Library) संसाधनांचा वापर**
- **नालसार विधी विद्यापीठाचे व्यावसायिक प्रमाणपत्र**

# अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन

या अभ्यासक्रमामध्ये वर्गातील अध्यापनाबरोबरच कार्यशाळा, मसुदा लेखन (Drafting) सराव, गटचर्चा आणि मार्गदर्शित प्रकरणांवरील प्रत्यक्ष काम (Mentored Casework) यांचा समावेश आहे. सहभागींच्या अध्ययनासाठी अभ्याससाहित्य, निवडक न्यायनिर्णय, नमुना मसुदे (Templates), ध्वनिचित्रित व्याख्याने (Recorded Lectures) आणि कौशल्यावर आधारित सराव साहित्य उपलब्ध करून दिले जाईल.

## मुख्य अभ्यासक्रम

- एकूण कालावधी: ६ महिने (नोव्हेंबर २०२६ ते एप्रिल २०२७)
- प्रत्यक्ष वर्ग: पुण्यात शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी (एकूण १४४ तास)
- स्व-अभ्यासासाठी अतिरिक्त वेळ देणे आवश्यक
- नियमित उपस्थिती बंधनकारक

## प्रकरण मार्गदर्शन मोड्यूल
## ( CASEWORK MENTORING MODULE)

- एक वर्षाचा मार्गदर्शन कार्यक्रम (मुख्य अभ्यासक्रमानंतर अतिरिक्त ६ महिने)
- सुरू असलेल्या फौजदारी खटल्यावर मार्गदर्शित सहाय्य

## अभ्यासक्रमाचा आराखडा

- परिचयात्मक विभाग
- मूलभूत फौजदारी कायदा तसेच विशेष कायदे
- तपास, अटक, कोठडी (रिमांड), जामीन आणि अटकपूर्व जामीन
- खटला सुरू होण्यापूर्वीची प्रक्रिया (Pre-trial Procedure) आणि खटल्यासाठीची तयारी
- फौजदारी खटल्याचे संचालन
- खटल्यानंतरची (Post-trial) प्रक्रिया

## मूल्यमापन व प्रमाणपत्र

- सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि नियमित अभिप्राय
- उपस्थिती, वर्गातील सहभाग, असाइनमेंट्स, ज्ञान चाचण्या आणि मौखिक युक्तिवाद (Oral Advocacy) यांच्या आधारे मूल्यमापन
- अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सहभागींस नालसार विधी विद्यापीठाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

THE SQUARE CIRCLE CLINIC

# अर्ज कसा करावा?

**अर्ज खाली दिलेल्या QR कोडद्वारे उपलब्ध असलेल्या ऑनलाइन अर्जाच्या माध्यमातून सादर करावेत.**

**<u>ऑनलाइन अर्जासोबत</u> पुढील कागदपत्रे आवश्यक आहेत :**

- **बायोडाटा (Resume)**
- **अर्जदाराने हा अभ्यासक्रम करण्यामागील प्रेरणा स्पष्ट करणारा ३ मिनिटांचा व्हिडिओ (मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत)**

**निवड झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. मुलाखतीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. विद्यापीठास निवड प्रक्रियेत आवश्यकतेनुसार अतिरिक्त टप्पे समाविष्ट करण्याचा अथवा विद्यमान प्रक्रियेत बदल करण्याचा अधिकार राहील.**

THE SQUARE CIRCLE CLINIC

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## १. या अभ्यासक्रमासाठी मला किती वेळ द्यावा लागेल?

**अभ्यासक्रमाच्या कालावधीत सहभागींस प्रत्यक्ष वर्गांना उपस्थित राहणे तसेच निर्धारित वाचन, ऑनलाइन अध्ययन मॉड्यूल्स आणि मूल्यमापन पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी दर महिन्याला ४ दिवसांच्या प्रत्यक्ष संपर्क वर्गांना उपस्थित राहणे आणि दर आठवड्याला वाचन, तयारी व असाइनमेंट्ससाठी अंदाजे [४] तास देणे अपेक्षित आहे.**

## २. वर्ग ऑनलाइन असतील की ऑफलाइन?

**अभ्यासक्रमामध्ये पुणे येथे प्रत्यक्ष वर्ग (In-person Classes) होतील. त्याचबरोबर स्वगतीने (Self-paced) पूर्ण करावयाच्या अध्ययन क्रियाही असतील. स्व-अभ्यासासाठीचे साहित्य आणि असाइनमेंट्स ऑनलाइन उपलब्ध असतील; मात्र थेट (Live) ऑनलाइन वर्ग होणार नाहीत.**

## ३. उपस्थिती अनिवार्य आहे का?

**होय. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी नियमित उपस्थिती बंधनकारक आहे.**

## ४. Casework Mentoring Module साठी स्वतःचे प्रकरण आणणे आवश्यक आहे का?

**सहभागी स्वतःच्या प्रॅक्टिसमधील एखाद्या प्रकरणावर काम करू शकतात. तसेच आवश्यक असल्यास कार्यक्रमाच्या टीममार्फत योग्य प्रकरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.**

# ५. प्रवास भत्ता किंवा निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल का?

नाही. प्रत्यक्ष वर्गांसाठी प्रवासभत्ता, निवास आणि भोजन यांचा सर्व खर्च सहभागीने स्वतः करावा लागेल.

# ६. अभ्यासक्रम शुल्क परत मिळेल का?

नाही. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही किंवा दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येणार नाही.

# ७. हा अभ्यासक्रम न्यायव्यवस्था (Judiciary), सरकारी अभियोक्ता (Prosecutor) किंवा इतर शासकीय भरती परीक्षांच्या तयारीसाठी उपयुक्त आहे का?

हा अभ्यासक्रम फौजदारी बचाव वकिलीमध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या वकिलांसाठी तयार करण्यात आला आहे. न्यायाधीश, सरकारी अभियोक्ता किंवा इतर शासकीय भरती परीक्षांसाठी मार्गदर्शन (Coaching) करणारा हा अभ्यासक्रम नाही.

THE SQUARE CIRCLE CLINIC

# CERTIFICATE COURSE ON CRIMINAL DEFENCE PRACTICE



**A continuing legal education programme offered in Pune by The Square Circle Clinic at NALSAR University of Law, Hyderabad**

**To bridge the gap between law school and practical skills needed for criminal defence practice in trial courts.**

The CLE Programme has been conceptualised by our Fair Trial team, drawing on over eight years of experience across more than 5,000 criminal cases, the release of over 1,500 undertrial prisoners and the training of early-career lawyers and social workers. The curriculum is further informed by the Clinic's experience in over 80 death penalty cases before the High Courts and the Supreme Court of India.

THE SQUARE CIRCLE CLINIC

# WHO SHOULD ENROLL?

The Programme is designed specifically for lawyers with 2–7 years of experience in criminal defence litigation before trial courts, seeking structured learning and exposure to criminal litigation.

# PROGRAMME HIGHLIGHTS

- Immersive practice-oriented learning
- Interdisciplinary Engagement - psychology, forensics, technology and electronic evidence
- Multilingual teaching in Marathi, Hindi and English
- Exposure to experienced practitioners - criminal defence lawyers, senior advocates, retired judges and academics
- Mentoring on cases for extending to 6 months post course completion
- Access to e-library resources of NALSAR University of Law during the course
- Professional certification from NALSAR University of Law

NALSAR HYDERABAD

THE SQUARE CIRCLE CLINIC

# COURSE STRUCTURE & PEDAGOGY

The Programme integrates classroom teaching with workshops, drafting exercises, group discussions, and mentored casework. Learning resources, including course materials, case extracts, practice templates, recorded lectures, and skill-based exercises will be provided to support participants' learning.

## COURSEWORK:

- Total Duration: 6 months (November 2026 - April 2027)
- In-person Classes: weekends and public holidays in Pune (total 144 hours)
- Additional hours of self-study will be required
- Mandatory Attendance

## CASEWORK MENTORING MODULE (OPTIONAL):

- One-year mentoring programme (extending 6 months beyond the core course completion)
- Guided support on an ongoing trial

## COURSE OUTLINE:

- Introduction to Criminal Defence
- Substantive Criminal Law including Special Laws
- Investigation, arrest, remand, bail and anticipatory bail
- Pre-trial procedure & preparation for trial
- Conducting a criminal trial and post trial procedure

## EVALUATION & CERTIFICATION

- Continuous assessment and regular feedback process.
- Evaluation on attendance, class participation, assignments, knowledge tests and oral advocacy exercises.
- Course Certificate awarded by NALSAR University of Law upon successful completion

THE SQUARE CIRCLE CLINIC

# ELIGIBILITY

The Programme will accommodate only upto 40 course participants. Interested candidates fulfilling the following eligibility criteria may apply as per the specifications provided herein:

- Between 2 and 7 years of experience in criminal defence litigation in a trial court within Pune district
- Proficiency in reading, writing and speaking Marathi and Hindi
- Familiarity with the use of MS Office, emails and the internet
- Ability to read, write and speak English is desirable

# COURSE FEE

- INR 5000 (to be paid before the commencement of the Programme). *Fee waivers may be offered to candidates from marginalised communities, economically weaker sections, women, sexual minorities and persons with disabilities.*

# IMPORTANT DATES

- Applications Open: July 29, 2026
- Last Date for Applications: September 15, 2026
- Programme Commencement: November 21, 2026

THE SQUARE CIRCLE CLINIC

# HOW TO APPLY?

Applications must be submitted through the online application form, accessible via the link or QR code below, by 5.00 p.m on September 15, 2026. The online form requires the following:

- Resume

- 3-min video of the applicant speaking about their motivation to apply for the course. The video can be in Marathi, Hindi, or English.

*Shortlisted applicants will be called for an interview. Interview dates will be communicated separately. The University reserves the right to add further rounds of selection or modify the above mentioned rounds.*

**Click link to access the google form, or scan the QR Code:**

# FREQUENTLY ASKED QUESTIONS (FAQS)

## 1. How much time will I need to dedicate to the Programme?

Participants must attend the in-person classes in Pune and complete assigned readings, online learning modules, and assessments during the course period. The requirement will be to attend a maximum of 4 days of contact classes every month and spend 4 hours per week on reading, preparation and assignments.

## 2. Are the classes online or offline?

The Programme will include in-person contact classes in Pune along with self-paced learning activities. Materials and assignments for self-paced learning will need to be accessed online. However, there will be no live online classes.

## 3. Is attendance compulsory?

Yes. Regular attendance is mandatory for successful completion of the Programme.

## 4. Do I need to bring my own case for the Casework Mentoring Module ?

Participants may choose to work on a matter from their own practice or, where possible, a suitable case may be identified with the support of the Programme team.

THE SQUARE CIRCLE CLINIC

## 5. Will travel allowance and accommodation be provided?

No. Participants will be responsible for arranging and bearing the costs of their own travel, accommodation, and meals during the in-person contact classes.

## 6. Can the course fee be refunded?

No. Once paid, the course fee is non-refundable and non-transferable under any circumstances.

## 7. Will the course help in preparing for judiciary, prosecutor, or other government job recruitment exams?

The Programme is intended for lawyers who are committed to building a career in criminal defence practice and is not designed as coaching for the judiciary, prosecution, or other government job entrance exams.